# असाधारण स्त्री

माझ्या मोहकतेचं गुपित शोधतात सुंदर सुंदर स्त्रिया कितीदा.
मी नाही तशी देखणी, ना माझा फॅशन मॉडेलसारखा बांधा.
जेंव्हा मी त्यांना सांगू लागते,
तेंव्हा त्यांना ते खोटेच वाटते सर्वदा!
मी म्हणते,
माझे गुपित आहे माझ्या बाहूंच्या आवाक्यात,
माझ्या सुडौल कटिप्रदेशात,
माझ्या झेपदार चालण्यात,
माझ्या मुरडलेल्या ओठांत.
मी एक स्त्री आहे
अफलातून.
'असाधारण स्त्री' म्हणतात,
ती मीच!

मी जेव्हा प्रवेश करते दालनात
हवी तितकी निर्विकार राहू शकते.
आणि पुरूषांचे विचाराल तर
बिचारे ताडकन उभे रहातात
किंवा गुडघे टेकून झुकतात.
माझ्याभोवती मग गोळा होतात,
जणू मधमाशा पोळ्यावरती.
मी म्हणते,
माझे गुपित आहे माझ्या नजरेतील अंगारात,
माझ्या दंतपंक्तीच्या चमकेत,
माझ्या कमरेच्या हेलकाव्यात,
पावलांत झुलणाऱ्या खुशीच्या लाटेत.
मी एक स्त्री आहे
अफलातून.
'असाधारण स्त्री' म्हणतात,
ती मीच!

पुरूषांनाही आपलेच नवल वाटते
असे काय दिसते त्यांना माझ्यात.
खूप प्रयत्न करतात तेही

पण प्रवेश करू शकत नाही
माझ्या त्या अंतस्थ रहस्यात.
मी जेंव्हा त्यांना दाखवू जाते,
तेंव्हाही त्यांना ते दिसत नाही!
मी सांगते,
माझे गुपित आहे माझ्या ताठ कण्यात,
माझ्या स्मितहास्याच्या लकेरीत,
माझ्या छातीच्या उभारीत,
माझ्या आकर्षक शैलीत,
मी एक स्त्री आहे
अफलातून.
'असाधारण स्त्री' म्हणतात,
ती मीच!

आता तुम्हाला समजेल की
माझे मस्तक का झुकलेले नाही.
करत नाही मी आरडाओरड, आदळआपट
की मोठ्या आवाजात बोलत नाही.
मला जेंव्हा जाताना पाहाल,
तेंव्हा फुलेल एक समाधान तुमच्या ठायी.
मी म्हणते,
माझे गुपित आहे माझ्या टाचांच्या ठेक्यांत,
माझ्या कुंतलांच्या वळणांत,
माझ्या सक्षम तळहातांत,
मदतरूप असण्याच्या माझ्या आग्रहात.
कारण, मी एक स्त्री आहे
अफलातून.
'असाधारण स्त्री' म्हणतात,
ती मीच!

Phenomenal Woman by Maya Angelou
Translation by Abhay B. Joshi and Milind A. Toro